**हिरण्यपथ :**
सद्गुरू गुरुनाथ विश्वनाथ मुंगळे,
कोल्हापूर.

© **सर्वहक्क :-** सौ. शैलजा गुरुनाथ मुंगळे

**प्रकाशन :-**
गायत्री अथर्व ज्ञानपीठ प्रकाशन
४८७/ब, नारायण पेठ,
सुवर्ण चेंबर्स, पुणे-३०
संपर्क : ९३७१०२२३०३ / ३०८

**प्रथमावृत्ती :-** आषाढ शुद्ध पौर्णिमा, शके १९१९
२० जुलै १९९७ (व्यास पौर्णिमा)
**द्वितीयावृत्ती :-** महाशिवरात्री
२३/०२/२००९

**मूल्य :-** १५०/-

## प्रकाशित पुस्तके -

१) चैतन्यधारा
२) अक्षरब्रह्म
३) साधकाचा प्रवास
४) समर्थ म्हणतात
५) ध्यानयोग
६) प्रचिती
७) नामसुधा
८) स्वामीपाठ
९) श्री गुरूचरण
१०) गुरुबोध

सौ. मीना महागांवकर यांचे विचारधन-
११) सद्गुरुंच्या सहवासात

## * अर्पण पत्रिका *

हिरण्यपथेच्छु सर्व साधकांना
सद्गुरू स्मरणपूर्वक समर्पण

# अनुक्रमणिका


| अ.नं. | लेखाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | भगवंत | १ |
| २. | भक्ती | ७ |
| ३. | अध्यात्मशास्त्र | १३ |
| ४. | शरणागती | २१ |
| ५. | जीवन | २८ |
| ६. | साधक | ३५ |
| ७. | मौन | ४३ |
| ८. | प्रार्थना | ५० |
| ९. | नीतिशास्त्र | ५९ |
| १०. | नशीब | ६८ |
| ११. | विपश्यना | ७७ |
| १२. | कर्मयोग | ८७ |
| १३. | ज्ञानयोग | ९६ |
| १४. | राजयोग | १०६ |
| १५. | ॐकारसाधना | १२० |
| १६. | गायत्री–उपासना | १३९ |
| १७. | साधनमार्ग | १५१ |
| १८. | एकाग्रता | १६५ |


## पुन्हा एकदा...

पुन्हा एकदा हिरण्यपथ अक्षरमाला वाचकांच्या समोर उलगडताना जो आनंद होत आहे त्या आनंदाचे अधिष्ठान सद्गुरुच आहेत व त्यांच्याच कृपेने ही अक्षरसेवा प्रकट होत आहे अशी आमची धारणा आहे. हिरण्यपथावरुन वाटचाल करत असताना साधकाला येणाऱ्या अनुभूती या विश्वमांगल्याच्या गर्भातून व सद्गुरुंच्या अमर्याद प्रकट व गुप्त चैतन्यरसातून ओल्याचिंब होऊन, त्यांच्या अक्षय ओलाव्यासह साधकहृदयी स्थित झाल्याचा प्रत्यय अनेक साधकांनी आम्हांला सांगितला आहे व त्याचा आनंदही आम्हांला मिळालेला आहे. प्रयत्नपूर्वक ग्रंथ लिहीणे व श्रीगुरुंच्या कृपेने अक्षरमाला हृदयात प्रकट होऊन कागदावर उमटविणे यात फार मोठा फरक आहे. पहिल्या प्रकारात देहबुद्धीचे अस्तित्व कार्यरत असते तर दुसऱ्या प्रकारात देहमाध्यमातून सद्गुरुच कार्य करतात. या ग्रंथातील सर्वच विषय आत्मज्ञानाच्या प्रांतामध्ये लिलया कार्यरत झालेले आहेत. त्या विषयांनी कोठेतरी सद्गुरु कृपेनेच माझ्या आत्मतत्त्वाशी सलगी केली व त्या सलगीतून अंतःकरणातील भगवद् प्रितीचा बांध फुटला म्हणून लिहीण्याशिवाय गत्यंतरच राहीले नाही. विश्वातील सर्वच संतांच्या मांदियाळीने जो भगवद्प्रेम पुरस्कार केला, तो पुरस्कार करत असताना भावक्षेत्रात व ज्ञानक्षेत्रात त्यांना ज्या अनिर्वचनिय परब्रह्मांचा अनुभव आला, तो येण्यासाठी त्यांनी कसा विचार केला असेल यावर आपोआप चिंतन झाले व त्या चिंतनाला 'सोन्याचा मार्ग' असे नाव दिले गेले. सुवर्णाचे अलंकार जरी होत असले तरी भगवंत हा खुद्द सुवर्णाचा अलंकार आहे म्हणूनच त्याचे सार्वभौमत्व, अक्षयत्व, अनादिअनंतत्त्व, चिद्विग्रह, या सर्व गोष्टी अबाधित आहेत हे निःसंशय! या ग्रंथाचा उपयोग विकल्परहीत साधनेसाठी, भावप्रचलनासाठी, भक्तीच्या सघनतेसाठी, शरणागतीच्या स्विकार व पुरस्कारासाठी, साधकाच्या अंतःकरणात भगवंताच्या लीलांच्या संधारणा व्हाव्यात यासाठी भगवंताच्या लीलाविग्रहासाठी अनुपम अशा कृतज्ञतेसाठी व भगवंताच्या ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य, यश, श्री, औदार्य या षड्गुणांच्या प्रत्ययासाठी होईल असे वाटते.

लेखक स्वतः ग्रंथ व्यावसायिक नाही व व्यवसायाशी निगडीत असे कर्म त्यांच्या हातून घडतही नाही, यदृच्छया जे घडेल तसे घडेल या इच्छेने, ग्रंथ घेऊन वाचा असेही म्हणणे होत नाही व सध्याच्या युगात या गोष्टीला पर्याय नाही हे मान्य करुनही,

भगवंताच्या ईच्छेनेच या ग्रंथाचा द्वितीय अनुबंध सिद्ध होत आहे याचाच अर्थ लेखकाचे वाचकांच्या हृदयातील भगवंत आपला कृपाकटाक्ष टाकत आहे असे वाटत राहाते.

लोकोपचाराच्या गोष्टी बाजूला ठेवून ईष्टार्थ सिद्धीसाठी जे कोणी हिरण्यपथमार्गी प्रवृत्त होतील त्यांचे आत्मकल्याण होईलच होईल यात संशय नाही. आशीर्वादासाठी पुन्हा एकदा ग्रंथ आपल्या समोर येत आहे अवलोकन करावा.



**प.पू. सद्‌गुरू श्री. गुरुनाथ वि. मुंगळे**